लाड कमिटी शिफारशीनुसार झाडू/सफाई कामगार पदी वारसा हक्काने नियुक्ती देणेबाबत...

कोल्हापूर महानगरपालिका
सामान्य प्रशासन विभाग
क्रमांक : आस्थापना/वशी-१९३८८/२०१९
दिनांक : २९ सप्टेंबर, २०१९

वाचा : १) महाराष्ट्र शासन, सामाजिक न्याय व विषेश सहाय्य विभाग, शासन परिपत्रक क्रं. सफाई-१०११/प्र.क्र.३२७/विधयो-२ दि. २१ ऑक्टोंबर २०११
२) महाराष्ट्र शासन, सामाजिक न्याय व विषेश सहाय्य विभाग, शासन परिपत्रक क्रमांक:सफाई-२०१४/प्र.क्र.०७/महामंडळे दि. २६ फेब्रुवारी २०१४
३) महाराष्ट्र शासन, सामाजिक न्याय व विषेश सहाय्य विभाग, शासन निर्णय क्रमांक:सफाई-२०१५/प्र.क्र.२६८/महामंडळे दि. ११ मार्च, २०१४.

## (आदेश)

कोल्हापूर महानगरपालिका सेवेत असताना झाडू/सफाई कामगार दिवंगत/वैद्यकीय कारणास्तव अकाली सेवानिवृत्त/सेवानिवृत्त/स्वेच्छा सेवानिवृत्त झालेल्या कर्मचाऱ्यांचे वारसास लाड कमिटी शिफारसी अनुषंगाने आदेशात नमूद केले पात्र वारसांची त्यांचे नावासमोर नमूद केले रिक्त पदावर कोल्हापूर महानगरपालिकेच्या सार्व. आरोग्य विभागाकडे झाडू/सफाई कामगार या पदावर आदेशातील अटी व शर्तीच्या अधिन राहुन अस्थायी स्वरुपाची तात्पुरती नेमणूक झाडू/सफाई कामगार पदाच्या मंजूर (वेतनश्रेणी) वेतनबँड रु. ४४४०-७४४० व ग्रेड पे १३०० (अधिक म.न.पा ने वेळोवेळी मंजूर केलेले इतर भत्ते) मध्ये पद स्थापित करण्यांत येत आहे.

शर्ती व अटी :

१. मा. जिल्हाधिकारी कार्यालय यांचेकडे प्रलंबित असलेल्या जिल्हास्तरीय चारित्र्य पडताळणी समितीच्या निर्णयाच्या अधिन राहुन नियुक्ती देणेत येत आहे.

२. झाडू/सफाई कामगार या पदाची नियुक्ती एक वर्षाच्या परिविक्षा कालावधीसाठी राहिल व परिविक्षा कालावधी, रुजू झाल्याच्या दिनांकापासून गणण्यात येईल. सदर परिविक्षा कालावधी मध्ये त्यांचे काम व वर्तणूक असमाधानकारक आढळून आल्यास त्यांना सेवेतून काढून टाकण्याचे अधिकार मा. आयुक्त, म.न.पा.कोल्हापूर यांना राहिल.

३. कोल्हापूर महानगरपालिका आस्थापनेवरील झाडू/सफाई कामगार हे पद कमी झाल्यास अथवा म.न.पा. कोल्हापूर यांना पात्र वारसांच्या सेवेची आवश्यकता नसल्यास त्यांना म.न.पा.च्या सेवेतून कमी करण्यांत येईल.

४. संबधीत पात्र वारसाची नियुक्ती तात्पुरत्या स्वरुपाची असल्याने संबधित पदांवर कोणतांही हक्क व उजर प्रस्थापित करता येणार नाही व केव्हाही पूर्व सूचना न देता त्यांना म.न.पा.च्या सेवेतून कमी करण्याचा अधिकार आयुक्त,म.न.पा. कोल्हापूर यांना राहील.

F:\I_Jaydeep\Anna_Solanki\lad comitee prastav.doc

५. सदर नियुक्तीद्वारे रूजू होणाऱ्या कर्मचारी यांना सध्याचे महाराष्ट्र नागरी सेवा नियमं तसेच क महानगरपालिका नियम उपविधी व विनिमय वेळोवेळी होणा-या बदलासह लागू राहतील.

६. महाराष्ट्र शासन वित्त विभाग क्रमांक अनियो/१००५/१२६/सेवा-४, मंत्रालय, मुंबई, दिनां ऑक्टोबर, २००५ चे शासन निर्णय व यास अनुषंगीक परिपत्रकान्वये संबधीत कर्मचाऱ्या अंशदान निवृत्ती वेतन योजना लागू होईल.

७. सदर नियुक्ती नंतर विशिष्ट ठिकाणीच काम मिळावे, अशी मागणी उमेदवारास करता येणा त्याकरिता गैर वाजवी दबाव आणलेस नियुक्ती रद्द होवू शकेल.

८. वरील पात्र वारसाने सदर आदेश मिळाल्याच्या दिनांकापासून ३० दिवसाच्या आंत कामावर रुज निर्धारीत मुदतीत रुजू न झाल्यास त्यांचा सदर नेमणूक मिळण्याचा हक्क आपोआप संपुष्टात याबाबत नंतर कोणताही पत्रव्यवहार इकडून केला जाणार नाही.

९. नियुक्ती नंतर परिविक्षा कालावधीत सेवा सोडून जावयाचे असल्यास, एक महिना अगोदर लेखी द्यावी लागेल किंवा एक महिन्याच्या वेतनाइतकी रक्कम म.न.पा.कोल्हापूरच्या फंडात जमा लागेल. परिविक्षा कालावधीनंतर सोडून जावयाचे असल्यास एक महिना याऐवजी तीन महिन राहील.

१०. उच्च शिक्षणाकरीता कार्यालयाच्या परवानगी शिवाय प्रवेश घेता येणार नाही. तसेच परिक्षेस बसता नाही.

११. झाडू/सफाई कामगार पदाची सेवा जेष्ठता ही या आदेशानुसार सेवेमध्ये रुजू होणाऱ्या दिनांक राहील.

१२. नियुक्ती पात्र वारसदार जर सध्या कोठे नोकरी करीत असेल तर तेथील अधिकाऱ्यांचे ना- प्रमाणपत्र (राजीनाम्यास मंजूरी दिल्याबाबतचे पत्र) प्राप्त करुन रूजु होतेवेळी संबधींत क प्रमुखाकडे सादर करावे लागेल.

१३. संबधीत पात्र वारसांने नियुक्तीच्या पदावर रुजु होतांना शैक्षणिक पात्रतेबाबत जन्म तारीख, विषयक वैधता प्रमाणपत्र व इतर प्रमाणपत्राच्या साक्षांकित प्रती आस्थापना विभागात सादर कर खोटी/बनावट कागदपत्रे सादर केल्यास ज्यावेळी सदर बाब निदर्शनास येईल त्यावेळी विनानोटीस कायमस्वरूपी संपुष्टात आणणेचे अधिकार मा.आयुक्त यांना राहतील.

१४. संबधीत उमेदवारांना पुढील नमुन्यात हमी पत्र रुपये १००/- चे स्टॅम्प पेपरवर द्यावे लागेल.

१५. सदर वारसा नोकरी कामी कसल्याही प्रकारची प्रशासकीय व न्यायालयीन बाब उदभवल्यास निरसण करण्याची सर्वस्वी जबाबदारी माझ्यावर राहील तसेच महानगरपालिकेस कोणत्याही प्र तोषीस लागू देणार नाही.

## हमीपत्र

"मी ---------------------------------------------------------- असे प्रमाणित करतो की, माझी कोल्ह महानगरपालिकेमधील ------------------------------------ या पदावरील नियुक्ती ही केवळ तात्पुरती असुन केंव कोणत्याही कारणाशिवाय समाप्त होवू शकेल. याबाबत मला संपूर्ण कल्पना आहे. दि. ................ नियुक्ती आदेशामध्ये नमूद असलेल्या सर्व अटी मला मान्य असून मी ही नियुक्ती स्विकृत क आहे."

१५ वरील १ ते १४ अटी मान्य असल्यास सदर आदेशामध्ये नमूद असलेल्या नियुक्त उमेदवाराने नियुक्तीचे पदावर रुजु होण्यावाबतचे प्रतिवेदन आवश्यक त्या सर्व कागदपत्रांसह आस्थापना अधिक्षक यांना द्यावे.

१६ आस्थापना अधिक्षक यांनी वर नमूद ११ ते १४ प्रमाणे उमेदवाराने दाखल केलेली आवश्यक कागदपत्रे तपासून योग्य आढळलेस रूजू करून घेणेवावतचा प्रस्ताव तात्काळ मंजुरीसाठी सादर करणेचा आहे.

| अ क्र | लाड कमिटी नियुक्ती अन्वये पात्र वारसाचे नांव | पदाचे नांव | रिक्त पद | नेमणुकीचे ठिकाण |
|---|---|---|---|---|
| १. | अनिकेत मोहन तडाखे | झाडू कामगार | कै. मोहन गुलाव तडाखे, दिवंगत | सार्व. आरोग्य विभाग |
| २. | किर्ती किरण मैना | सफाई कामगार | किरण रामपाल मैना, सेवानिवृत्त | सार्व. आरोग्य विभाग |

उप-आयुक्त (I)
कोल्हापूर महानगरपालिका

<u>मा. आयुक्तसो यांचे मान्यतेने</u> }

<u>प्रत माहितीसाठी व जरुर त्या कार्यवाहीसाठी</u> :

१ आरोग्याधिकारी, को.म.न.पा.
२ मुख्यलेखापरीक्षक
३ मुख्यलेखापाल
४ मुख्य आरोग्य निरीक्षक
५ आस्थापना अधिक्षक/ लिपीक
६ अधिक्षक, पेन्शन/प्रा. फंड विभाग
७. स्वीय सहाय्यक-आयुक्त/अति. आयुक्त, उप-आयुक्त (I) (II) /सहाय्यक आयुक्त (I) (II)
८. भांडार अधिक्षक
९. रेकॉर्ड किपर
१०. संबंधीत पात्र वारस उमेदवार

F:\I_Jaydeep\Anna_Solanki\lad comitee prastav.doc